# सोडून देश आलो

सोडून देश आलो देशांतरास आता
नाती तिथेच उरली ओढा घरास आता ।१

परतून ओढ लागे चिंता जिवास होते
तिथलेच काय सारे होतात भास आता ।२

झालेत पोरके ते बघ माय आणिक पिता
दचकून मी उठे मग अडकून घास आता।३

मज न वाटले कधी ते आकर्षण पैसा
पटणार का कुणाला सांगून खास आता? ।४

सागर कसा झुरावा वाटेत भावनांच्या
स्वैरावल्या मनाला अडवीत पाश आता ।५

सांगू कशी तुला मी व्यवधान वेदनांचे
पाहील का मलाही अंतात हमखास आता

-----------------------------------

- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, ताळगाव, गोवा